**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०६ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारत आणि अमेरिका यांच्यात सकारात्मक, दूरदृष्टीपूर्ण, व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन; ट्रम्प यांच्या भूमिकेचं केलं स्वागत.**
2. **भारत रशियाकडून तेल खरेदी करत राहील अशी केंद्रीय अर्थमंत्र्यांची स्पष्टोक्ती.**
3. **नागपूरसह विदर्भात गणरायाला वाजत गाजत निरोप.**
4. **नागपूर मनपाचे प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकतींची सुनावणी येत्या ०९ सप्टेंबर रोजी.**

---

**मोदी-ट्रम्प**

भारत आणि अमेरिका यांच्यात, अतिशय सकारात्मक, दूरदृष्टीपूर्ण, व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उभय देशांमधल्या संबंधांबद्दल केलेल्या विधानावर त्यांनी, समाज माध्यमावर प्रतिक्रिया दिली आहे. भारत आणि अमेरिकेतल्या संबंधाबाबत, ट्रम्प यांनी अतिशय संवेदनशील आणि सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल पंतप्रधानांनी कौतुक केलं आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातले संबंध, विशेष असून त्याबाबत चिंता करण्यासारखं काही नाही असं, ट्रम्प यांनी काल, प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितलं. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एक श्रेष्ठ पंतप्रधान असून ते आपले कायमच, चांगले मित्र राहतील असंही ट्रम्प म्हणाले.

---

**आढावा बैठक**

देशभरातील निवडणूक प्रक्रियांचा आढावा घेण्यासाठी, केंद्रीय निवडणूक आयोगानं, येत्या दहा सप्टेंबरला एक बैठक बोलावली आहे. देशातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना या महत्वपूर्ण बैठकीला बोलवण्यात आलं आहे.

-----------------------------------------------

**जीएसटी-अजित पवार**

केंद्र आणि राज्यांचा समावेश असलेल्या, जी.एस.टी. परिषदेनं, जी.एस.टी.त सुधारणा आणि दर कपात केल्याबद्दल, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, स्वागत केलं आहे. जी.एस.टी.तील बदल आणि दैनंदिन, जीवनावश्यक वस्तूंवरील कर, कमी करण्याचा केंद्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय आहे. यामुळे सामान्य माणसांचं राहणीमान सुधारेल, बाजारपेठेतील मागणी वाढून, अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल याचा लहान व्यावसायिकांना लाभ होईल असं, पवार यांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे.

-----------------------------------------------

**वस्तू आणि सेवाकर**

वस्तू आणि सेवाकर परिषदेनं ५६व्या बैठकीत वस्तू आणि सेवाकर रचनेच्या सु-सूत्रीकरणाला मान्यता दिली असून यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरात जी.एस.टी.कर आकारणी होईल. या सुधारणेचं स्वागत व्यापारी तसंच सामान्य नागरिकही करत आहेत. ऐकूया यावर नागपूरच्या त्रिमूर्ती नगर इथल्या रहिवासी आणि गृहिणी अंजली देशपांडे यांची प्रतिक्रिया.....

***(होल्ड बाईट - अंजली देशपांडे- ३४ सेकंद)***

***नुकताच वस्तू आणि सेवा कर यामध्ये शासनाने सुधारणा करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो अतिशय महत्त्वाचा आणि सुयोग्य आहे असं मला वाटतं. या निर्णयामुळे वस्तू आणि सेवा कर आकारणी मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांचा फायदा सगळ्यांनाच होईल. कौटुंबिक विमा आरोग्य, विमा पॉलिसी यांना सेवा करातून सवलत देण्यात आली आहे. अनेक जीवनावश्यक औषध सुद्धा सेवा करातून मुक्त करण्यात आल्याने आजारांवरील उपचार स्वस्त होतील असं वाटतं. विशेषतः गृहिणींना लागणाऱ्या नित्य उपयोगी वस्तू सुद्धा 18 टक्क्यांवरून केवळ पाच टक्के आल्यामुळे घर खर्चावरील ताण नक्की कमी होईल.***

-----------------------------------------------

**ओबीसी आंदोलन**

राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासाठी काढलेल्या पहिल्या शासन निर्णयात पात्र असा शब्द वापरला होता. नंतर दुसरा शासन निर्णय काढून हा शब्द वगळण्यात आला. याचा अर्थ मराठा समाजाला ओबीसींतून सरसकट आरक्षण देणार असा होतो. हा मूळ ओबीसी समाजावर अन्याय आहे. याविरोधात लढा

देण्यासाठी २५ प्रमुख लोकांची एक समिती गठीत करून ऑक्टोबरमध्ये नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढणार, अशी माहिती ओबीसी नेते तथा काँग्रेसचे विधानसभेतील पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. नागपुरातील रवी भवन येथे शनिवारी विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यातील ओबीसी संघटनांची बैठक झाली. नागपुरात येत्या १२ सप्टेंबरला प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत मराठा आरक्षणासंदर्भात जाहीर शासन निर्णयावरील लढाईच्या अनुषंगाने व्यूहरचना निश्चित होईल. मात्र दोन स्तरावर लढाई लढण्याचे शनिवारच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. पहिली लढाई न्यायालयीन स्तरावर लढली जाणार आहे. विदर्भातून वकील संघटना पूर्ण ताकदीने न्यायालयात बाजू मांडणार आहे. त्यांना ओबीसी संघटनांचा पाठिंबा असेल तर दुसरा लढा आंदोलनाच्या माध्यमातून केला जाईल असेही वडेट्टीवार स्पष्ट केले. कुणावरही अन्याय होऊ नये, ही आमची भूमिका आहे. सोबतच आमच्या हक्काचे संरक्षण होणेही आवश्यक आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये, ही आमची भूमिका असल्याचेही त्यांनी सांगितले.

---------------------------------------------

**स्वयंरोजगार सेवा पंधरवडा**

राज्य शासनाच्या कौशल्य विभागामार्फत, रोजगार आणि स्वयंरोजगार सेवा, पंधरवडा साजरा केला जाणार आहे. १७ सप्टेंबर ते दोन ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या या पंधरवड्यात, राज्यातल्या सुमारे ७५ हजार युवक आणि युवतींना, कौशल्यविषयक प्रशिक्षण दिलं जाणार आहे. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी ही माहिती दिली. या पंधरवड्यात, एक ऑक्टोबर रोजी राज्यातल्या ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये या अभ्यासक्रमांचा शुभारंभ केला जाणार आहे.

---------------------------------------------

**तेल खरेदी**

भारत यापुढेही रशियाकडून तेल खरेदी करत राहील आणि कोणत्याही निर्णयामागे, राष्ट्रहित सर्वोपरी असेल असं ठाम प्रतिपादन, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं आहे. रशियाकडून तेलाची खरेदी असो किंवा अन्य मुद्दा असो, योग्य दर आणि लॉजिस्टिक्सनुसार, आपल्या आवश्यकतांना प्राधान्य दिलं जाईल असं, त्या काल एका मुलाखतीत म्हणाल्या. भारताच्या आयातीत, कच्च्या तेलाचं प्रमाण अधिक असल्याचा पुनरुच्चार, त्यांनी केला. नवीन जी.एस.टी. प्रणालीमुळे, वस्तूंचा

खप वाढेल मात्र त्यामुळे, भांडवली खर्चावर काहीही परिणाम होणार नाही. बहुतेक सर्व म्हणजे, ९९ टक्के वस्तू आणि सेवा आता, शून्य, पाच किंवा १८ टक्के स्लॅब अंतर्गत येतात असं, त्यांनी सांगितलं. अमेरिकेनं ५० टक्के आयात शुल्क केल्यामुळे, ज्या निर्यातदारांना फटका बसला आहे. त्यांच्यासाठी काही उपाय योजना करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. आत्मनिर्भर भारताचं उद्दिष्ट केवळ सर्व वस्तूंचं उत्पादन भारतात करायचं असं नाही तर, अनिश्चित जागतिक परिस्थितीत, आत्मसन्मान अबाधित राखणं असाही आहे असं, सीतारामन म्हणाल्या.

---

**गणेश विसर्जन**

गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची आज, अनंत चतुर्दशीच्या दिवशी, गणेश विसर्जनानं, सांगता होत आहे. विघ्नहर्ता गणरायाच्या निरोपासाठी, नागपूर शहरात, आज कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. होमगार्ड आणि एस.आर.पी. जवानांसह, आठ हजार पोलिस, तैनात करण्यात आले आहेत. पोलिस आयुक्त डॉ.रवींद्रकुमार सिंगल यांनी, वरिष्ठ अधिकाऱ्यांना, बंदोबस्ताबाबत निर्देश दिले आहेत. शहरात आज, शनिवारपासून सार्वजनिक मूर्तींचे, विसर्जन सुरू होत आहे. विसर्जन मार्गावर, ठिकठिकाणी फिक्स पॉइंटही करण्यात आले आहेत. सी.सी.टीव्ही कॅमेरासह, ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी, नागपूर मनपाद्वारे, शहरातील सर्व तलावांमध्ये, विसर्जनाला पूर्णत: बंदी करण्यात आली आहे. विसर्जनासाठी, मनपातर्फे, शहरातील प्रमुख तलावांचे परिसर, तसंच, अन्य २१६ ठिकाणी, एकूण ४१९ कृत्रिम विसर्जन तलावाची व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य विसर्जनस्थळी, विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. **वाशीम** शहरात आज श्रीगणेश विसर्जन सोहळ्याची सुरुवात, धार्मिक वातावरणात, ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय जल्लोषात झाली. या सोहळ्याचे उद्घाटन, खासदार संजय देशमुख यांच्या, शुभहस्ते, मानाचा गणपती शिवशंकर गणेश मंडळ यांची, पारंपरिक पद्धतीनं, गणरायांची पूजाअर्चा करून, विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ केला. शहरातील प्रमुख गणेश मंडळांच्या मूर्ती, पारंपरिक रथ, सजवलेल्या ट्रक आणि आकर्षक सजावटीसह, मिरवणुकीत सहभागी झाला. महिलांनी आरत्या करून, तर बालगोपाळांनी, फुग्यांसह वेशभूषेत सहभाग घेऊन, सोहळ्याची शोभा वाढवली. **बुलडाणा** जिल्हाभरात, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागामध्ये, जिल्ह्यातील एक हजार ३८५ सार्वजनिक मंडळांकडून, विसर्जन मिरवणुकी दरम्यान, विविध देखावे सादर करत, गणपती विसर्जन मिरवणुका,

शांततेत सुरू आहेत. यात शहरी भागात, ४७० तर ग्रामीण भागात, ९२५ सार्वजनिक गणेश मंडळांकडून, दुपारच्या सुमारास, गणपती बाप्पांच्या विसर्जन मिरवणूकांनी सुरुवात करण्यात आली. **गोंदिया** शहरात देखील घरगुती गणपती बाप्पाचे विसर्जन, इको फ्रेंडली पद्धतीनं करण्यात येत असून, शहरात दोन ठिकाणी, विसर्जनासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. तर काही ठिकाणी तलावावर आणि नदीवर देखील, श्रीगणेशाचं विसर्जन करण्यात येत आहे.

-----------------------------------------------

**प्रारूप प्रभाग रचना**

नागपूर मनपाच्या, आगामी सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगानं, २३ ऑगस्ट रोजी, प्रसिध्द केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर, चार सप्टेंबर पर्यंतच्या, विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या एकुण, ११५ हरकती आणि सुचनांवर, येत्या नऊ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत आयुक्त सभा कक्ष, नागपूर मनपा, मुख्यालय, सिव्हिल लाईन नागपूर इथं सुनावणी घेण्यात येणार आहे. याबाबत, नागपूर मनपामार्फत, सर्व संबंधित आक्षेप कर्त्यांना, उपस्थित राहण्या बाबत नोटीस पाठविण्यात आल्या आहे. सदर सुनावणी घेण्यासाठी, नगर विकास विभाग यांचे, प्राधिकृत अधिकारी, श्रावण हर्डीकर यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या समक्ष, सुनावणी होणार आहे. त्यांचंसोबत, आयुक्त तथा प्रशासक, मनपा नागपूर, हे देखील, सुनावणीस उपस्थित राहणार आहेत.

-----------------------------------------------

**हवामान**

विदर्भाच्या चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये, उद्या वादळी पर्जन्यमानाचा, यलो अलर्ट देण्यात आला असून, परवा आठ तारखेला, बुलढाणा, अकोला आणि वाशिम वगळता, संपूर्ण विदर्भामध्ये, वादळी पर्जन्यमानाचा, यलो अलर्ट देण्यात आला आहे. आज देखील सकाळपासून, नागपुरात ढगाळ वातावरण असून, त्यामुळे उकाडा वाढला आहे. दरम्यान, येत्या काही तासात, गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर, नागपूर या जिल्ह्यात, तुरळक ठिकाणी, पावसाच्या हलक्या सरी बरसण्याची शक्यता, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे.

-----------------------------------------------